# महाराष्ट्रातील जेम्स लेन प्रकरण आणि आर. आर. पाटील यांचा ऐतिहासिक दृष्टिकोन

रविराज रामचंद्र साळुंखे
संशोधक विद्यार्थी,
डी. एस. एम. कला, वाणिज्य व
विज्ञान महाविद्यालय, परभणी

**गोषवारा**

राजकारण, समाजकारण व अर्थकारण अशा सर्व क्षेत्रात देशाला पुरोगामी विचार महाराष्ट्राने दिला. मात्र आज महाराष्ट्रामध्ये पुरोगामी विचारांशी फारकत घेतली जात आहे. आज महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे, अशी सवंग वल्गना प्रत्येक राज्यकर्त्यांकडून केली जाते. तसा महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक वारसा लाभलेलासुद्धा आहे, परंतु राजकीय स्वार्थ साधण्यासाठी अनेक राज्यकर्त्यांकडून खोट्या ऐतिहासिक अस्मितांचे प्रकटीकरण केले जाते. परंतू पुरोगामी लोक धर्म व इतिहास विरोधी असतात, हे विधान पूर्णत: असत्य आहे. धर्म आणि इतिहास याचा उगम, स्वरूप आणि त्याची कार्ये या माध्यमातून पुरोगामी विचारवंतांनी असे निश्चित केले आहे की, मानवी जीवनातील असुरक्षितता, भीती, एकटेपणा यावर विजय मिळविण्यासाठी धर्म आणि इतिहास नेहमी तत्पर राहिला आहे.

पुरोगामित्व आणि अस्मिता या राजकीय पटलावर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या उक्तीप्रमाणे राजकीय क्षेत्रात सामाजिक सलोखा साधून विकासाची संकल्पना अत्यंत प्रगल्भतेने राबवली गेली. ह्या संदर्भ लक्षात घेता महाराष्ट्रामध्ये सन २००३ मध्ये प्रकाशित झालेल्या **जेम्स लेनच्या "शिवाजी: द् हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया"** या पुस्तकावरून मराठी जनतेच्या अस्मिता दुखावल्या गेल्या, परंतु हे प्रकरण सबुरीने हाताळणे अगदी जिकिरीचे होते. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. (आबा) पाटील यांनी घेतलेली भूमिका महत्वपूर्ण ठरते. ही भूमिका निभावताना कायदा, सुव्यवस्था व अस्मितेला तडा न जाता घेतलेले निर्णय महत्त्वपूर्ण होते. हेच ऐतिहासीक निर्णय अभ्यासणे या शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**प्रस्तावना:**

भारताच्या एकूणच जडणघडणीमध्ये महाराष्ट्र हा केंद्रस्थानी होता. राजकारण, समाजकारण व अर्थकारण अशा सर्व क्षेत्रात देशाला पुरोगामी विचार महाराष्ट्राने दिला. मात्र आज महाराष्ट्रामध्ये पुरोगामी विचारांशी फारकत घेतली जात आहे. आज महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे, अशी सवंग वल्गना प्रत्येक राज्यकर्त्यांकडून केली जाते. तसा महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक वारसा लाभलेलासुद्धा आहे, परंतु राजकीय स्वार्थ साधण्यासाठी अनेक राज्यकर्त्यांकडून खोट्या ऐतिहासिक अस्मितांचे प्रकटीकरण केले जाते. महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाचे जे पुरावे दिले जातात, ते म्हणजे शाहु – फुले – आंबेडकर यांच्या पुनीत झालेल्या महाराष्ट्रामध्ये आपण राहतो. मग असा प्रश्न पडतो, की महाराष्ट्रामध्ये जातीय दंगे, स्वार्थी अस्मितेचे राजकारण, धर्म भेद, राजकीय तेढ आदीसारख्या गोष्टी प्रकर्षाने का घडतात? आज भारतीय राज्य व्यवस्थेमध्ये प्रत्येक पक्ष व गटाकडून अस्मितेचे राजकारण केले जात

आहे. परंतु या सवंग लोकप्रियतेसाठी केलेल्या राजकारणातून व्यक्तिगत स्वार्थ साध्य होतो. मग अशा राष्ट्रात मोठ्या लोकशाही विचारांचा मोठा गवगवा काय कामाचा?

पुरोगामी लोक धर्म व इतिहास विरोधी असतात, हे विधान पूर्णत: असत्य आहे. धर्म आणि इतिहास याचा उगम, स्वरूप आणि त्याची कार्ये या माध्यमातून पुरोगामी विचारवंतांनी असे निश्चित केले आहे की, मानवी जीवनातील असुरक्षितता, भीती, एकटेपणा यावर विजय मिळविण्यासाठी धर्म आणि इतिहास नेहमी तत्पर राहिला आहे. तत्त्वाचा, ध्येयाचा मार्ग अनुसरून जगण्यासाठी मानवी मनातील अपेक्षा वा कोणत्याही प्रकारचा अतिरेक नियंत्रित करण्यासाठी वेगवेगळ्या काळात, वेगवेगळ्या व्यक्तींना इतिहास व धर्माने अधिकचे बळ दिले आहे. इतिहास आणि धर्माची ही सकारात्मक बाजू पुरोगामी मान्य करतात, तसेच पुरोगामित्वामध्ये अस्मिता ही महत्त्वपूर्ण भूमिका निभावत असते. अस्मिता या शब्दाचा अर्थ हा एखाद्या घटनेविषयी, व्यक्तीविषयी व गटाविषयी असलेली श्रद्धा होय. पण श्रद्धा म्हणजे विनाचिकित्सा पूर्ण किंवा अढळ विश्वास होय.

आज या देशात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेची वाताहत होताना दिसत आहे. असे जरी असले तरी विकासाची संकल्पना रुजवत असताना ऐतिहासिक वारसेची अस्मिताही बाजूला करून चालणार नाही. असा विचार महाराष्ट्रातील काही विभूतींनी आपल्या जीवनाशी जोडलेला आहे. पुरोगामित्व आणि अस्मिता या राजकीय पटलावर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. या उक्तीप्रमाणे राजकीय क्षेत्रात सामाजिक सलोखा साधून विकासाची संकल्पना अत्यंत प्रगल्भतेने राबवली गेली. याचा संदर्भ लक्षात घेता महाराष्ट्रामध्ये सन २००३ मध्ये प्रकाशित झालेल्या **जेम्स लेनच्या “शिवाजी: द् हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया”** या पुस्तकावरून मराठी जनतेच्या अस्मिता दुखावल्या गेल्या, परंतु हे प्रकरण सबुरीने हाताळणे अगदी जिकिरीचे होते. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचे तत्कालीन गृहमंत्री आर. आर. (आबा) पाटील यांनी घेतलेली भूमिका महत्वपूर्ण ठरते. ही भूमिका निभावताना कायदा, सुव्यवस्था व अस्मितेला तडा न जाता घेतलेले निर्णय महत्त्वपूर्ण होते. हेच निर्णय अभ्यासणे या शोधनिबंधाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी करण्याकरीता दुय्यम स्त्रोताचा आधार घेतलेला आहे. यामध्ये माहिती संकलनासाठी विधानसभेतील चर्चा, मासिके, वृत्तपत्रे, संदर्भ ग्रंथसंपदा आणि इंटरनेट इत्यादी साधनांचा अवलंब करण्यात आलेला आहे. तसेच या शोधनिबंधाची मांडणी करण्यासाठी उद्दिष्टे निश्चित केली आहेत, ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**उद्दिष्टे:**

१. आर. आर. पाटील यांच्या राजकीय विचारातील ऐतिहासिक दृष्टिकोन अभ्यासणे.

२. आर. आर. पाटील यांचे पुरोगामित्व आणि सामाजिक अस्मिता या विचारातील सांगडीचे अध्ययन करणे.

**गृहीतके:**

१. आर. आर. पाटील यांच्या पुरोगामित्व विचाराला ऐतिहासिक, पारंपारिक व सांस्कृतिक वारसेचा स्पर्श होता.

२. आर. आर. पाटील यांच्या राजकारणामध्ये सामाजिक सलोखा हा विचार मध्यवर्ती होता.

**अ) जेम्स लेन प्रकरण:**

जेम्स लेन प्रकरण हे महाराष्ट्रामध्ये सन २०१० च्या पर्वात खूप गाजले होते. संपूर्ण महाराष्ट्रभर हे प्रकरण अस्मितेचा भाग म्हणून नावारुपास आले होते. या प्रकरणामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेमध्ये जनक्षोभ उसळलेला होता. हे प्रकरण महाराष्ट्राच्या ऐतिहासिक

वारसेच्या अस्मितेचा गळा घोटणारे होते. जेम्स लेन प्रकरण हे तसेच संपूर्ण देशातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय पातळीवरतीसुध्दा गाजले होते. म्हणून जेम्स लेन प्रकरण काय आहे? या प्रकरणामुळे मराठी अस्मिता का दुखावली? याचा विचार या मुद्द्यातंर्गत समजून घेणे अगत्याचे वाटते.

**“शिवाजी: द् हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया”** हे वादग्रस्त पुस्तक अमेरिकन लेखक जेम्स लेन यांनी लिहिलेले आहे. हे पुस्तक लंडनच्या ऑक्सफर्ड प्रेस या प्रकाशनाने भारतामधून जून २००३ मध्ये प्रकाशित केले होते. दरम्यानच्या कालखंडामध्ये (ऑगस्ट – सप्टेंबर, २००३) या पुस्तकावर मराठी व इंग्रजी प्रसार माध्यमातून विविधांगी पैलूवर चर्चा झालेली होती. काही मराठी अभ्यासकांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या संबंधित आक्षेपार्ह लिखाणा संबंधित समीक्षा केली. यावर संबंधित आक्षेपार्ह लिखाणातून शिवरायांची बदनामी करणारी वक्तव्ये या पुस्तकात नमूद होती. या घटनेमुळे महाराष्ट्रातील जनतेमध्ये संताप उसळणे, हे स्वाभाविक होते. त्यामुळे तत्कालीन महाराष्ट्र सरकारने १५ जानेवारी २००४ मध्ये या पुस्तकावर बंदी घातली होती. परंतु २६ एप्रिल २००७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने पुस्तकावरील बंदी उठवली. या कारणास्तव महाराष्ट्राच्या जनतेमध्ये मोठा प्रक्षोभ निर्माण झाला होता. हा जनप्रक्षोभ शमविण्यासाठी तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी घेतलेली भूमिका अतंत्य महत्वपूर्ण होती. या भूमिकेमुळे आर. आर. पाटील यांच्यावर समाजातील अनेक व्यक्तींकडून टीकाही झालेल्या होत्या. परंतु आर. आर. पाटील यांनी हे प्रकरण एकांगी न हातळता समाजातील कायदा व सुव्यवस्था न कोलमडू देता, तसेच ऐतिहासिक वारसा व अस्मितेला तडा जाऊ न देता अगदी सबुरीने हातळले. या अनूषंगाने आर. आर. पाटील यांचा ऐतिहासिक दृष्टिकोन अभ्यासने यथोच्छित वाटते.

**आर. आर. पाटील यांचा ऐतिहासिक दृष्टिकोन:**

आज पुरोगामी महाराष्ट्राच्या वल्गना करणारे राज्यकर्ते अनेक पाहावयास मिळतील. तसेही आज या महाराष्ट्रात अनेक नेते होऊन गेले, परंतु जनतेसाठी स्थानिक पातळीवरील प्रश्न समजावून घेणारे लोकनेते फारसे झाले नाहीत. राजकीय प्रक्रियेत मात्र संमिश्र प्रकारची लोकं असतात. लोकशाहीच्या राजकारणातील पहिले ते 'धर्मकारण' हे असे लोकसेवेचे व्रत आहेत आणि दुसरे ते 'सावधपण' हे त्यांचे पथ्य आहे. समर्थ राजकारणी त्याशिवाय होऊ शकत नाही. वैचारिक आणि नैतिक भूमिका घेऊन राजकारणाचे शिवधनुष्य उचलणे हे सामान्य काम नाही. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज असे असामान्य राजकारण करू शकले. आदिलशाही, कुतुबशाही, मुघलशाही, पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रज अशा सर्व बाजूंनी वेढलेल्या चक्रव्यूहातून 'हिंदवी स्वराज्या'चा ध्वज दोनशे वर्षे किल्ल्यावर फडकावत ठेवणे, हे महाराष्ट्राच्या इतिहासातील तेजस्वी पर्व होते. हाच आदर्श समोर ठेवून महाराष्ट्रातील काही राज्यकर्त्यांनी राजकारण केले आहे. त्यांनी ऐतिहासिक अस्मिता व पुरोगामित्व यांची सांगड घालून विवेकनिष्ठ राजकारण करणारे महाराष्ट्रात आजपावेतो हाताच्या बोटावर मोजण्याइतके राज्यकर्ते पाहावयास मिळतात. नेतृत्वाचा क्षेत्रात वक्तृत्व आणि कर्तृत्व यांची वानवा असते. आपला विचार आणि संदेश शेवटच्या माणसापर्यंत पोहचविणे हे कठीण काम असते. वरील तिन्ही क्षेत्रांत प्रभावी काम असेल, तरच संदेश अंतिम माणसापर्यंत पोहोचविणे शक्य असते. असाच राज्याच्या राजकारणात एक स्वच्छ निर्मळ प्रतिमेचा नेता म्हणून ओळखले जाणारे आर. आर. पाटील हे एक होय.

महाराष्ट्र ही महान व्यक्तींची जन्मभूमी आहे. महाराष्ट्र ही महान कृतींची कर्मभूमी आहे. महाराष्ट्र ही अभंग मुक्तीची स्फूर्तीभूमी आहे. तर नैतिक त्यागाची आणि सेवेची यज्ञभूमी आहे. या उक्तीप्रमाणे संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, छत्रपती शिवाजी महाराज, स्वामी विवेकानंद, संत तुकडोजी महाराज, लोकशिक्षक गाडगेबाबा, फुले, शाहू, आंबेडकर, महात्मा गांधी,

आचार्य विनोबाजी भावे, सानेगुरुजी यांच्या नैतिक परंपरेचा वारसा आर. आर. पाटील यांच्या राजकारणात दिसून येतो.

आजची राजकारणाबद्दलची मानसिकता अशी आहे कि, राजकारणामध्ये सक्रिय होण्यासाठी राजकीय वारसा किंवा पैसा असे समीकरण आहे. परंतु आर. आर. पाटील यांच्याबाबतीत मात्र अगदी निराळेच झाले. शिवाय त्यांची प्रश्न मांडण्याची पद्धत अथवा सामाजिक भाषण देण्याची पद्धत ही अत्यंत प्रभावी होती. त्यांनी आजपर्यंत मांडलेले प्रश्न व सार्वजनिक जीवनात एक लोकप्रतिनिधी म्हणून समाजामध्ये केलेले प्रबोधन हे दृष्ट्या नेतृत्वाचे प्रकटीकरण म्हणावे लागेल. स्वत:च्या अनुभवाच्या वाटचालीतून अनुभवलेली खेड्यांची दु:खे याला एक रचनात्मक व सकारात्मक पर्याय त्यांनी दिला, तो म्हणजे महाराष्ट्राला योग्य दिशा देण्यासाठी राबविलेल्या योजनांमध्ये शिवकालीन पाणी साठवण योजना, जलस्वराज्य योजना, यशवंत ग्रामसमृद्धी योजना, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अशी अभियाने मोठ्या ताकदीनं सुरू केली. तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावे एक विधायक स्पर्धाही सुरू केली. या माध्यमातुन 'ग्रामगीता' ही खेडोपाड्यात पोहचण्यास मदत झाली. त्यांच्या या सृजनशील कार्यक्रमामध्ये व लोककल्याणकारी राज्याच्या संकल्पनेमध्ये विकसीत असा ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीकोन होता.

**आर. आर. पाटील यांची जेम्स लेन प्रकरणाबद्दलची भूमिका :—**

जेम्स लेनच्या पुस्तकावर बंदी घालण्यासाठी महाराष्ट्र शासनाने १५ जानेवारी २००४ ला आदेश काढला होता. तो २६ एप्रिल २००७ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने उठविला होता. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने मे — २००७ मध्ये सर्वोच्च न्यायालयात अपील केली होती. सर्वोच्च न्यायालयाने दि. ९ जुलै २०१० रोजी मुंबई उच्च न्यायालयाचाच निकाल कायम केलेला होता. जेम्स लेनच्या पुस्तकावर राज्यशासनाने टाकलेल्या बंदीबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत महाराष्ट्र राज्यामध्ये मराठीत जनतेत तीव्र प्रतिक्रिया निर्माण होणे, हे साहजिक होते. या दरम्यान राज्यात आघाडीचे सरकार होते. तत्कालीन महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्या भूमिकेवर विरोधी पक्षासह समाजाने रोष व्यक्त केला होता. परंतू राज्यातील हा समाजाचा रोष आर. आर. पाटील यांनी समाजाच्या भावनाचा आदर करुन अत्यंत सबूरीने, संयमाने हाताळला होता. या कृतीवरुन आर. आर. पाटील हे इतिहास, संस्कृती व परंपराविरोधी होते, असे म्हणणे सार्थ चुकीचे ठरेल. कारण लोकहिताच्या दृष्टिकोणातून त्यांनी राबविलेल्या योजना ह्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारलेल्या होत्या. त्यामुळे आर. आर. पाटील यांनी संबंधित प्रकरणाबद्दल विधानसभेत केलेल्या वक्तव्यावरुन त्यांचा ऐतिहासिक, सांस्कृतिक दृष्टिकोन समजून घेता येईल. दरम्यान त्यांनी मांडलेल्या प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे विचारात घेता येतील.

शासनाच्यावतीने हे पुस्तक तपासण्यात आले, तेंव्हा निश्चितपणे त्यात अनेक आक्षेपार्ह बाबी होत्या. राज्य कायद्यावर चालते हे जितके खरे आहे, तितकेच लोकांच्या भावनेचा अनादर करून राज्य करणे हे सुद्धा योग्य ठरत नाही. त्यामुळे राज्य सरकारने या पुस्तकावर बंदी आणण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. जनतेच्या तशा तीव्र भावना आहेत, तशाच तीव्र भावना राज्य सरकारच्यासुद्धा आहेत. या महाराष्ट्रामध्ये अशी बदनामी कोणी करता उपयोगाची नाही, तसेच ते सहनही करता उपयोगी नाही, असे आर. आर. यांचे स्पष्ट वक्तव्य होते. या पुस्तकाचे सर्कुलेशन होऊन लोकापर्यंत जाऊन आणखी उद्रेक होऊ नये, राज्यातील कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, तसेच छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी होऊ नये, म्हणून राज्य सरकारने या पुस्तकावर बंदी आणण्याचा निर्णय घेतला. दरम्यान तत्कालीन काही सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, राज्य सरकारने चांगले वकील दिले नाहीत. याबाबत आर. आर. यांनी सभागृहात असा खूलासा केला की, ही केस हायकोर्टात चालविली होती. शासनाच्यावतीने या पुस्तकावर निर्बंध घालताना सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विधी व

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

न्याय विभागाचा सल्ला घेऊन कोर्टामध्ये वरिष्ठ वकिलांची नेमणूक करून ही केस चालवली होती. हायकोर्टात व सुप्रीम कोर्टात सरकारचा दावा टिकू शकला नाही, ही वस्तुस्थिती होती. पुस्तकाचे पुढे काय होईल, सुप्रीम कोर्टाने निर्बंध उठविले तर हे पुस्तक पुन्हा मार्केटमध्ये येईल काय? जगामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी अशीच चालू राहील काय? यावर तत्कालीन सरकारने काही उपायही योजलेले होते.

देशातील महापुरुष आणि इतिहास पाहिला तर इतिहास घडविणारे व इतिहास लिहिणारे ही वेगळी असल्यामुळे नेहमी वस्तुनिष्ठ इतिहास कधीच समोर येत नाही. त्यामुळे छत्रपतींना कोणी हिंदूंचा राजा मानतात, तर कोणी छत्रपतींना मराठ्यांचा राजा मानतात. सर्वांना पहिल्यांदा छत्रपतींना समजून घेण्याची आवश्यकता आहे. छत्रपतींना ज्याप्रमाणे अफजलखानाबरोबर लढावे लागले होते, त्याचप्रमाणे मिळालेले सर्व किल्ले आणि जहागीर राजा जयसिंगालासुद्धा लढताना द्यावे लागले होते. मराठी रयतेचा राजा जिवंत राहावा म्हणून देहाचे तुकडे करून घेणारा बाजीप्रभू देशपांडे छत्रपतींच्या जवळ होता. छत्रपतींना फक्त मोगलाबरोबर लढाया कराव्या लागल्या नाहीत, तर छत्रपतींना मराठ्यांसोबतसुद्धा लढाया कराव्या लागल्या आहेत. आदिलशहाने छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य नाकारले होते. चंद्रराव मोरे यांनीदेखील छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य नाकारले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यदलामध्ये आरमार प्रमुख मुस्लिम होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले राज्य एक सर्व जातीधर्माचे मिळून निर्माण केलेले रयतेचे राज्य होते. त्यांना एका धर्मात बंदिस्त करणे बरोबर नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव मागील ३५० वर्षापासून महाराष्ट्राला प्रेरणा देत आलेले आहे आणि पुढील कित्येक शतके देशाला प्रेरणा देत राहील. त्या महापुरुषाला आपण कोणी छोटे करण्याची आवश्यकता नाही. छत्रपती शिवाजी महाराज एका जातीमध्ये, एका धर्मामध्ये, एका पक्षामध्ये सामावू न शकणारे व्यक्तिमत्व नव्हते, अशीही त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी महती व्यक्त करुन राज्याची ऐतिहासीक परंपरा मोठी केली.

महापुरुषांच्याबाबतीत आणि अस्मितेच्या प्रतीकांच्याबाबतीत कायदा असण्याची आवश्यकता आहे, याविषयाची जाणिवही आर. आर. यांनी व्यक्त केली होती. जाती–धर्मामध्ये तेढ निर्माण करण्याचा कोणी प्रयत्न करीत असेल, तर १५३ (A) कायदा आपल्या राज्यात अस्तित्वात आहे. हे लक्षात घेऊन दरम्यानच्या तत्कालीन सरकारने ॲडव्होकेट जनरलच्या अध्यक्षतेखाली ए. सी. एस., गृह, विधी व न्याय विभागाचे सचिव या तिघांची एक समिती गठीत केली. छत्रपती शिवाजी महाराजांच्याबाबतीतच नव्हे तर कोणी महापुरुषांच्याबाबतीत कोणी असे लेखन केले, चित्र काढले, तर सरकारला त्यांच्याविरुद्ध कारवाई करता यावी, म्हणून एका कायद्याची आवश्यकता आहे आणि मी सभागृहाला सांगू इच्छितो की पूर्ण अभ्यास करून हा कायदा आणण्याची आवश्यकता आहे. कारण अनेक जुन्या रूढी, परंपरामधून कधी ना कधीतरी समाजाला बाहेर काढले पाहिजे. म्हणून कायदे करतानासुद्धा परिवर्तन व सुधारणा याला बाधा न येता व अनुचित प्रकार घडणार नाही अशा पद्धतीने जपूनच कायदे करावे लागतील. तमिळनाडू सरकारने केलेल्या कायद्याचा सरकार अभ्यास करेल आणि त्यामध्ये आणखी काही भर घालता येईल का हे देखील बघू शकेल. दरम्यान आर. आर. पाटील यांनी सभागृहाला आश्वासन देताना असे स्पष्ट केले की, पुन्हा कोणी जेम्स लेनसारखे किडे येथे येऊन वळणार नाही, त्यासाठी एक कठोर कायदा पुढील अधिवेशनामध्ये शासनामार्फत आणला जाईल.

आता प्रश्न आहे की सुप्रीम कोर्टाने जेम्स लेनच्या पुस्तकावरील स्थगिती उठविली आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने वेगळा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे या पुस्तकाचे काय होईल? जसा देशातील व महाराष्ट्र राज्यातील जनतेचा निर्धार पक्का आहे तसाच सरकारचासुद्धा निर्धार आहे.

आर. आर. पाटील विधानसभेपुढे आपली भूमिका अशी स्पष्ट करतात की, मी सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आजच ऑक्सफर्ड प्रेसने फॅक्सद्वारे महाराष्ट्र शासनाला लेखी स्वरुपात कळवले आहे की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय असला तरी जेम्स लेन लिखित पुस्तकाचे पुन्हा नव्याने प्रकाशित करण्यात येणार नाही. सरकारचा कोणत्याही समाज घटकाच्या भावना दुखावण्याचा हेतू नाही. तरी हे पुस्तक दिनांक २१ नोव्हेंबर २००३ पासून बाजारातून काढून घेण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचा अभिमान व अस्मिता आहे. त्यांच्याबद्दल विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना जेवढा आदर आहे, तेवढाच आदर आम्हा सर्वांच्या मनात आहे. तसूभरसुद्धा कमी असण्याची शक्यता नाही व असणारही नाही. त्यामुळे यासंदर्भात विरोधकांनी आमच्यावर शंका घेण्याची गरज नाही. छत्रपती शिवाजी महाराज सर्व महाराष्ट्राचे आहेत. शासनाच्या वतीने जेम्स लेनचा निषेध करणारा ठराव आपण सर्वांनी मिळून करावा, जेणेकरून पुन्हा अशी कोणीही हिंमत करणार नाही. यासंदर्भात जेम्स लेनने जी अक्कल पाजळली होती, त्याबद्दल मी आपल्या सर्वांच्यावतीने जेम्स लेन चा धिक्कार करावा असा या ठिकाणी ठराव मांडतो. तसेच यासंदर्भात नवा कायदा आणून अशाप्रकारे महाराष्ट्रात कोणत्याही महापुरुषांची बदनामी केली जाणार नाही, यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील असेही मी आज या सरकारच्या वतीने या सदनाला अभिवचन देतो.

वरील आर. आर. पाटील यांच्या अभिवचनावरुन असे लक्षात येते की, त्यांनी आपल्या संस्कृतीचा आदर करणे, त्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे, समाजामध्ये कायदा व सुव्यवस्था टिकविणे, ऐतिहासिक प्रतिकं आणि विभूतींच्या नावाने प्रेरित होवून लोककल्याणकारी योजना राबविणे, समाज एकसंधपणा ठेवणे आदी मुल्यांद्वारे सामाजिक सलोखा राखण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संदर्भ सूची:**

१. खेडेकर पुरुषोत्तम (२०१०), मराठा मार्ग (मासिक), सौरभ प्रिंटिंग प्रेस, नागपुर
२. महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही, खंड—१५६, क्र.१, दिनांक १२ जुलै २०१०, पृ. क्र. ९२—११८
३. महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही, खंड—१५५, क्र. ३L, दिनांक १२ जुलै २०१०, पृ. क्र. १५२
४. सावंत इंद्रजीत (२०१०), दादोजी कोंडदेव वाद आणि वास्तव, Satyashodhak.com
५. देशपांडे ज्ञानदा (२०१०), लेन प्रकरणाचा धडा, Thinkmaharashtra.com